# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी — २२६२०६०१/२२६९०६०२/२२६४११५०/२२६४११५१ फॅक्स - २२६९ २१०२.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


प्रवेशासंबंधी महत्वाची सूचना

क्रमांक : २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/२०१८/ ५८

दिनांक : 15 JAN 2018

**शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रे**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र तसेच प्रथम वर्ष फार्म. डी., वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम (Under Graduate), पदविका अभ्यासक्रम, प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक., एम.फार्म., एम.आर्किटेक्चर, एम.एचएमसीटी, एमबीए/एमएमएस हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम (Post Graduate) तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी (Post Graduate) या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येतात. त्यासाठी अर्ज करतांना सुविधा केंद्रांवर कागदपत्रे पडताळणीच्यावेळी प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या आवश्यक त्या प्रकरणी लागू पडणारी खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त करुन घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

१) जात /जमात प्रमाणपत्र ( Caste/ Tribe Certificate )(सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )

२) जात / जमात वैधता प्रमाणपत्र (Caste / Tribe Validity Certificate ) (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले ) पदविका प्रवेशासाठी वैधता प्रमाणपत्र आवश्यक नाही परंतु इतर लाभांसाठी आवश्यक आहे.

३) नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (Non- Creamy Layer Certificate) (अनूसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ) [राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांचा अधिवास महाराष्ट्र राज्यात असला तरी महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या आरक्षणाचे धोरण त्यांना लागु नाही.]

४) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार )

५) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate) (TFWS योजनेअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )

६) अपंगत्वाचे प्रमाणपत्र (Person with Disability) (आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)

७) सैन्य दलातील/अल्पसंख्यांकासाठी (Defence, Minority) इ. संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांच्या प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील प्रमाणपत्रे.

८) आधार क्रमांक व संलग्नित बँक खाते : शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती इ. योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक.

<u>इशारा :</u> शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये काही उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही प्रमाणपत्रे जसे जात / जमात प्रमाणपत्रे / जात वैधता प्रमाणपत्रे /अपंगत्वाचे प्रमाणपत्र / नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्रे ही,सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त करून न घेता बनावट प्रकारची सादर केल्याचे पडताळणीअंती आढळून आले होते अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्यांचेविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. प्रवेशोच्छुक उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सक्षम प्राधिका-याकडूनच प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावीत. बनावट अथवा खोटी प्रमाणपत्रे प्रवेशासाठी सादर केल्याचे आढळल्यास अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करून त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

वेगवेगळया वर्गवारी अंतर्गत प्रवेशासाठी आवश्यक असणा-या प्रमाणपत्रांची तपशीलवार माहिती प्रवेश नियमांत अंतर्भुत असते. त्याचा तपशील संचालनालयाच्या http://www.dtemaharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

C:\Users\desk2a\Desktop\required documents for admission २.docx